**गत वर्षात ....**

मनाच्या पाटीवर......
खूप काही, सांडले आहे....
काही बाही, टोचते आहे......
नको ते साचते आहे...
म्हणूनच .. ......
पाटी .....कोरी, करीन म्हणते!

वॉट्सअॅप वरती....
गोतावळा जमवला आहे...
शब्द, चित्रातून,
संवाद साधला आहे,
पण काहींची इमोजीच्या पुढे
गाडी गेली नाही ...
जवळ ते आलेच नाहीत ,
म्हणूनच ....
ते सर्व .....डिलीट, करीन म्हणते!

नात्यात, मैत्रीत...
हिशोब कधी मांडलेच नाहीत,
हातचे काही राखलेच नाही,
प्रेम कधी आटलेच नाही,
पण एकतर्फी नात्याचे,
आता ओझे वाटायला लागलेय...
म्हणूनच...
मागचे .....सर्व, आता विसरीन म्हणते ....

नकोत आता ....
काही उसनी नाती,
नकोत आता ....

काही अपेक्षांची ओझी,
नकोय आता .....
दुसऱ्यांसाठी जगणं,
नको आता ....
आपले मन मारून
इतरांचे मन जपणं....

म्हणूनच
मनाची पाटी ......कोरी करीन म्हणते,
नविन वर्षात ......
त्यावर फक्त.....
मला हवे ..., तेच, ....लिहीन म्हणते!

**चित्रा मेहेंदळे**